(ESTD. 1965)
Gondia Education Society's
SETH NARSINGDAS MOR COLLEGE OF ARTS & COMMERCE &
SMT. G. D. SARAF SCIENCE COLLEGE
Tumsar-441912 (M.S.) Dist. Bhandara
Ph. No. Office : (07183) 233300 Res. : (07183) 233301
Email - principalsnmorcollege@rediffmail.com, snmorcollege1965@gmail.com website : snmorcollege.org.in

Ref. No. : SNMC/2023-24 Date : 18.01.2024

# एस. एन. मोर महाविद्यालयात भूगोल दिवस उत्साहात साजरा

एस. एन. मोर महाविद्यालयात भूगोल विभागाद्वारे भूगोल दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे व तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून डॉ. मधुकर गोमासे, स्व. पार्वताबाई मदनकर कला महाविद्यालय, वरठी येथील भूगोल विभाग प्रमुख लाभले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील कला शाखा व अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. जयंतकुमार मस्के लाभले होते. कार्यक्रमाचे तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. मधुकर गोमासे यांनी भूगोलाच्या विद्यार्थ्यांना भविष्यात करिअर अर्थात नोकरीच्या संधी कुठे-कुठे उपलब्ध आहेत व त्यासाठी कोणते पूरक कोर्सेस करणे आवश्यक आहे, तसेच विद्यार्थ्यांची शिक्षणाप्रती आवड दिवसेंदिवस कशी कमी होत आहे, नवीन शिक्षण प्रणाली मुळे भविष्यात कशा समस्या निर्माण होतील यावर प्रकाश टाकला. प्रास्ताविक डॉ. अरुणा बावनकर भूगोल विभाग प्रमुख यांनी केले, त्यांनी भूगोल दिवस साजरा करण्याचे कारण व महत्व सांगून मकरसंक्रांतीचे भूगोलाच्या दृष्टीने महत्व विषद करून या दिवसापासून ऋतू परिवर्तनाला सुरुवात होते, हे स्पष्ट करून सांगितले. संचालन गुलशन गौपाले याने तर आभार प्रदर्शन अश्विनी बोरकर हिने केले. कार्यक्रमाला डॉ. रेणुकादास उबाळे, डॉ. काटेखाये, डॉ. राठोड, डॉ. दिप्टे इ, भूगोल अभ्यास मंडळातील सदस्य व विद्यार्थी उपस्थित होते.




(डॉ. सी. बी. मसराम)
Principal
S. N. Mor Collge of Arts & Commerce &
Smt. G. D. Saraf Science College,
Tumsar.